Annexure A
Application under the Right to Information Act, 2005.
(See Rule 3)



To,

PIO, Nagar Sachiv Department **नगर सचिव विभाग**
Mira Bhayandar Municipal Corporation,
Late Indira Gandhi Bhavan,
1st floor, Chhatrapati Shivaji Marg,
Bhayandar (w) - 401101.

**1.** Full Name of the Applicant : Brijesh Sharma

**2.** Address : Room No 403, Jupiter-A CHS Ltd, Behind Deepak Hospital, Mira Bhayander Highway (East), Mumbai-401107. Mobile# 9322683456

**3.** Information Sought : Action taken on complaint logged through email on dated **Tuesday, January 9, 2018, 10:11:58 PM GMT+5:30** for cancellation of ***Nagar Sewak of 1) Mrs. Neela Sonas , the Corporator (Nagar Sewak of Ward No 18 C) and 2) Mr. Vijay Rai , Corporator (Nagar Sewak of ward No. 18D) for disqualification from the post of Corporator (Nagar Sewak) ,Sections 10(1D), 11 and 12 of the Maharashtra Municipal Corporations Act, 1949 on the ground of their involvement in construction*** (Henceforth called "the said complaint") (Copy enclosed **"Annexure-2"**).

**Provide information within 10 days ordered by मा. राज्य माहिती आयुक्त, कोंकण रोजी दिनांक.9.8.2017 क्र.के आर 5041/2016 & दिनांक.11.8.2017 क्र.के आर 5184/2016. Please refer "Annexure-1" enclosed copy for more details.**

**4.** **(Kindly provide Stamped, Signed and Certified True Copies or Attested Copies or Authenticated Copies of information provided on this RTI application. Kindly provide the information point-wise and in English language as far as possible as required under Section 6 (1), 4 (3) and 7 (9) of the RTI Act, 2005.) On the information sought in point no.6 below.)**

**5.** The period to which the information relates: 01-Jan-2018 to till date of RTI reply.

**6.** Description of the information required: Kindly provide information.

a) **Kindly provide the information in below format.**

| Date on which application received | Action Taken | Name and designation of officers receiving it. | Date on which forwarded to next officer / office |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

b) **Multiple officers will be involved to take action on said complaint. Kindly provide the photocopy of each letter on action taken report and transfer of my application to concerned officer / office.**

**PIO Please note:--**

**a)** If you wish to deny any of the information sought by me then please quote the exemption clause of Section 8 (1) and a brief reason as to how it applies. This is a requirement of the RTI Act, as per Section 7 (8) (i) read along with Section 19 (5).

**b)** If any of the information sought is available with any other Dept. then kindly transfer the copy of the concerned query to that department and promptly inform me in writing of the same, giving details of the Dept. to which it is transferred. [See Sec. 6 (3) (ii).]

**c)** If information sought needs to be extracted from a file etc., then it should be done as per Sec. 2 (j)

**d)** As per section 7(9) of RTI Act, the information should be supplied in the form asked for. Hence, supply point wise information on all above points separately for each point.

Place : Mira Bhayander
Date : 20/01/2018

[Brijesh Sharma]
[RTI Activists & Member of
AAM AADAMI PARTY]

# Annexure-1

**माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपालखर्चासह कळविण्याबाबत आणि माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा आढावा घेऊन त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१७ /प्र.क्र.(२०८/१७) सहा.**
मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.
दिनांक- १७.११.२०१७.

परिपत्रक:-

माहिती अधिकारात अर्जदाराला वेळेवर माहिती मिळण्यासाठी, जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास जलदगती टपालाने टपालखर्चासह तपशीलवार कळविण्याबाबत एक परिपत्रक निर्गमित करण्याचे निर्देश व्दितीय अपील क्र.केआर ५०४१/२०१६ मध्ये दि.९.८.२०१७ रोजी मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दिले आहेत आणि अन्य व्दितीय अपील क्र.केआर ५१८४/२०१६ मध्ये १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम जलदगती टपालाने अर्जदारास टपालखर्चासह कळविण्यासह शासन कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी आवश्यक आर्थिक तरतूद तीन महिन्यात करण्याचे निर्देश मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दि.११.८.२०१७ रोजी दिले आहेत. मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ यांच्या सदर निर्देशानुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सुचित करीत आहे.

२. "जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर, १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपाल पृष्ठसंख्या व टपालखर्चासह, जलदगती टपालाने तपशीलवार कळवावी. तसेच सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी दरवर्षी आवश्यक आर्थिक तरतूद करावी".

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनिक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

४ सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७१११७११३२२९३००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Chhaya Kiran
Wadte

Digitally signed by Chhaya Kiran Wadte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, ..., cn=Chhaya Kiran Wadte
Date: 2017.11.17 11:04:55 +05'30'

**(छा.कि.वडते)**
**शासनाच्या उप सचिव.**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३. सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६. *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७. *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०.*प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११.मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१३.सर्व मंत्रालयीन विभाग
१४.सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी
१५.महासंचालक, यशदा, पुणे
१६.निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

*पत्राने

# "Annexure-2"



Subject: Complaint against 1) Mrs. Neela Sonas , the Corporator (Nagar Sewak of Ward No 18 C) and 2) Mr. Vijay Rai , Corporator (Nagar Sewak of ward No. 18D) for disqualification from the post of Corporator (Nagar Sewak) ,Sections 10(1D), 11 and 12 of the Maharashtra Municipal Corporations Act, 1949 on the ground of their involvement in construction

From: brijesh100_sharma@yahoo.com

To: mbmc.commissioner@gmail.com; mbmcho@gmail.com; rajbhavan@maharashtra.gov.in; governor-mh@nic.in; CM@maharashtra.gov.in; CS@maharashtra.gov.in; sec.ud2@maharashtra.gov.in; psec.ud2@maharashtra.gov.in

Cc: petitiongroup2@googlegroups.com; petitiongroup@googlegroups.com

Bcc: aapmbh@gmail.com; arshadalam.siddique@gmail.com; starvision@live.in; dubeyprp@gmail.com; dk12pal@gmail.com; bmd.mumbai2@gmail.com; brijesh100.sharma@gmail.com

Date: Tuesday, January 9, 2018, 10:11:58 PM GMT+5:30

**09.01.2018**

TO :--

**The Commissioner, Mira Bhayandar Municipal Corporation**
Head office, Bhayandar (West), Thane 401101.
Email: mbmc.commissioner@gmail.com

CC :--

1. **Hon. Governor Maharashtra State**
   Raj Bhavan, Malabar Hill, Mumbai, Maharashtra–400035
   Email: rajbhavan@maharashtra.gov.in, governor-mh@nic.in

2. **The Chief Minister, Maharashtra State**
   Mantralaya, 6th Floor, Mumbai, Maharashtra–400032
   Email: CM@maharashtra.gov.in

3. **The Chief Secretary, Maharashtra State**
   Mantralaya, 6th Floor, Mumbai, Maharashtra–400032
   Email: CS@maharashtra.gov.in

4. **Urban Development Department (UDD-II), Maharashtra State**
   Principal Secretary (UD II), 4th Floor, Mantralaya,
   Mumbai-400032
   Email ID: sec.ud2@maharashtra.gov.in; psec.ud2@maharashtra.gov.in

**Subject :--** Complaint against 1) Mrs. Neela Sonas , the Corporator (Nagar Sewak of Ward No 18 C) and 2) Mr. Vijay Rai , Corporator (Nagar Sewak of ward No. 18D) for disqualification from the

post of Corporator (Nagar Sewak) ,Sections 10(1D), 11 and 12 of the Maharashtra Municipal Corporations Act, 1949 on the ground of their involvement in construction

**Reference :--** *1) Illegal Vachnalaya and Encroachment on MBMC Reserved Land for Garden Facility Garden bearing No. 261 at Village Navghar on the land bearing survey No. 397 old New 165, Behind Shivar garden and near Kanakia Police Station*

*2)* ***Annexure-1*** *DP plan shows plot reserved for garden*

*3)* ***Annexure-2*** *Shows photograph of illegal structure constructed on public reserved land and being used for commercial purpose by* Corporators (Nagar Sewak)

**Respected Sir,**

My submission is with due respect and all humility, with no intention to cause hurt and injury to any individual and /or institution, but only in the interest of public at large. In the event, if my submissions are incorrect, I shall be obliged if your office can educate me by furnishing relevant documents in support.

Without prejudice to my rights and contentions and in further to; I want to bring in your kind of notice that a **SHOW CAUSE NOTICE** shall be issued to **Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai for Corporators (Nagar Sewak) of Ward No 18 C & 18D** on the ground of construction and supporting and misusing power and position for illegal and unauthorized structure violating the provisions of Sections 10(1D), 11 and 12 of the Maharashtra Municipal Corporations Act, 1949 or the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

-

**Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai being a Councilor shall be disqualified from Corporators (Nagar Sewak) of Ward No 18 C & 18 D.**

**a)** Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai, both have constructed illegal and unauthorized structure violating the provisions of this Act, 1949 and the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

**b)** Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai, both being a Councilor have physically, obstructed and tried to obstruct MBMC Encroachment Department and Ward Office 06 officers and Competent Authority from discharging its official duty in demolishing of illegal and unauthorized structure.

**c)** Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai, both being a Councilor have directly or indirectly been responsible for, or helped in his capacity as such Corporators in carrying out such illegal or unauthorized construction on reserved for playground for children and senior citizen of kanakia residence.

**d)** Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai, both being a Corporators are using illegal structure for commercial purpose.

**e)** Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai, both being a Corporators are using for birthday posters, Hoarding & banners and running commercial business from said illegal structure.

**f)** Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai, both being a Corporators are making huge revenue loss to MBMC.

**g)** Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai both, being a Corporators are using free of cost public reserved land which is reserved for playground for children and senior citizen of kanakia residence.

**h)** Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai, both being a Corporators have disobeyed the direction of law, abused and misused their position as public servant with dishonest intentions for saving themselves and other accused from punishment for committing the offence of causing wrongful gains to themselves by doing illegal construction and wrongful loss to MBMC.

**i)** Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai, both being a Corporators knows the accused of illegal structure, with dishonest intentions for saving themselves from punishment and to cause wrongful gains to the developer and wrongful loss to MBMC.

**j)** Conspired and acted in furtherance to evil design for the purpose

1. To cause wrongful loss to public authority.
2. To cheat public authority.
3. To cause wrongful gains to the developer.
4. Aided and abetted the offence committed by other accused.

**k)** The Commissioner of MBMC has to direct the **Encroachment Department and Ward Office 06 Department officers** to visit the spot and inspect illegal structure immediately and demolish the illegal structure & construction and direct the officers to act in accordance to law.

In the circumstances herein above, I request you to notice should be issued to ***Mrs. Neela Sonas & Mr. Vijay Rai Corporators (Nagar Sewak) of Ward No 18 C& 18D on the ground of illegal and unauthorized constructing done by them and for violation of the provisions of Sections 10(1D), 11 and 12 of the Maharashtra Municipal Corporations Act and the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966".***

And for this act of kindness the complainant shall as in duty bound ever pray.

**JAI HIND**

**Place : Mira Bhayander**
**Date : 09-Jan-2018**

**[Brijesh Sharma]**
**[RTI Activists & Member of AAM AADAMI PARTY]**
Residing at :-- Flat No 403, Jupiter A chs ltd,
P.K. Road, Opp. Deepak Hospital, Mira Road East, Thane 401105
Mobile :-- 9322683456

Complaint for Disqulaification of Mira Bhayandar NagarSewak.docx
2.5MB

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय**

**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401101**

## नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ 79 /2017-18 दि. 28/09 /2018.

**प्रति,**
**श्री. ब्रिजेश शर्मा,**
**रुन नं. 403, ज्युपीटर-ए को.ऑ.हौ.सो.,**
**दिपक हॉस्पीटल मागे, मिरा भाईंदर हायवे (पूर्व)**

**विषय :-** **महानगरपालिका नगरसेविका श्रीम. निला सॉस व नगरसेवक श्री. विजय राय यांचे नगरसेवकपद रद्द करणेबाबत आपण दि. 09/01/2018 रोजी आपले सरकार पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रारीसंबंधी माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 20/01/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज. (या कार्यालयास प्राप्त दि. 24/01/2018)**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, महानगरपालिका नगरसेविका श्रीम. निला सॉस व नगरसेवक श्री. विजय राय यांचे नगरसेवकपद रद्द करणेबाबत दि. 09/01/2018 रोजी आपले सरकार पोर्टलवर आपण दाखल केलेल्या तक्रारीसंबंधी माहितीची मागणी केलेली आहे. त्यानुसार आपणांस पुढीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

आपणांकडील आपले सरकार पोर्टलवरील टोकन क्र. Dist/MNTH/2018/25529, दि. 09/01/2018 ची तक्रार प्रभाग समिती क्र. 03 कडून नगरसचिव विभागास दि. 17/01/2018 रोजी प्राप्त झालेली आहे. प्राप्त तक्रार अर्जात नमुद बांधकामाबाबत नगररचना विभाग तसेच अतिक्रमण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडून वस्तुस्थितीदर्शक सविस्तर अहवाल मागविणेसाठी दि. 24/01/2018 रोजी अहवाल सादर करण्यात आलेला असुन, अहवालावर दि. 24/01/2018 रोजी मा. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, दि. 24/01/2018 रोजी मा. विधी अधिकारी श्रीम. सई वडके, दि. 25/01/2018 रोजी मा. उपायुक्त (मु.) श्री. विजयकुमार म्हसाळ व दि. 29/01/2018 रोजी मा. अतिरीक्त आयुक्त श्री. माधव कुसेकर यांची स्वाक्षरी झालेली असुन, दि. 29/01/2018 रोजी मा. आयुक्त डॉ. नरेश गिते यांचे मान्यतेस्तव अहवाल अग्रेषित करण्यात आलेला आहे. (संदर्भास्तव मुळ नस्ती वर्ग करताना घेतलेल्या पोच पानाची छायांकित प्रत देत आहोत)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

Brijesh 30/01/2018

28/1/18

**(कैलास दामोदर म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

E:\\01 MD\01 NS\Mahiti Adhikar\2014-15\Letter – Brijesh Sharma

# कार्य विवरण

प्रमाण सूचि ८० म.
Std. Sectt. 80 m.

| अनुक्रमांक १ | फाईल क्रमांक २ | कार्यवाहीखालील विषय ३ | प्रकरण कोणास सादर केले व कोणत्या दिनांकास ४ | शेरा ५ |
|---|---|---|---|---|
| ७ | २१७/१७ | मेयस कार्पोरेशन<br>नगरसेवक ओळखपत्र बनवून<br>दिलेबाबत देयक. | आ.मुख्य लेखापरिक्षक<br>मि.भा.मनपा. | [signature] २९/१२ |
| ८ | १२/१/१८ | श्री. राजू गोयल यांनी श्रीम.<br>डिम्पल विनोद मेहता, मा. महापौर<br>यांचे नगरसेवक पद रद्द करणेबाबत<br>अहवाल व मुळनस्ती वर्ग करणे.<br>मुळन. पाने (१ ते ५३) | मा. [illegible]<br>[illegible]<br>मा. उपायुक्त (मु)<br>मा. आयुक्त दालन<br>२०/१/१८ | [signature]<br>१२/१/18<br>20/1/18 |
| ९ | १५/१/१८ | मि.भा.मनपा सार्वत्रिक निवडणूक<br>२०१७, च्या निवडणुकीतील प्रभाग<br>क्र. १४ ब मधील उमेदवार श्रीम.<br>सुजाता यशवंत पारधी (हडकर)<br>यांचेविरुद्ध तक्रारीसंबंधी अहवाल<br>व मुळनस्ती वर्ग करणे (मुळनपाने-५) | मा. विधि अधिकारी<br>मि.भा.मनपा. | [signature]<br>16/1/18 |
| १० | २४/१/१८ | निला सोंस व श्री. विजय राय<br>यांचे नगरसेवकपद रद्द करणेबाबत.<br>संदर्भ:- श्री. ब्रिजेश शर्मा यांची आपले<br>सरकार पोर्टलवरील टोकन क्र. DISTI<br>MBMC/2018/25529 दि. ०१/१२०१८ बाबत<br>अहवाल (मुळन पाने. ३३) | मा. उपायुक्त (मु)<br>मा. [illegible]<br>मि.भा.मनपा.<br>मा. अतिरिक्त आयुक्त<br>मि.भा.मनपा<br>मा. आयुक्त दालन - [signature] 29/1/2018 | [signature] 24/1/18<br>[signature] |

मिरा भाईंदर महानगरपालिका

टिपणी पान क्र. 09

विभाग : नगरसचिव

दि. 24/01/2018

(L) (R)

सादर,

विषय :- श्रीम. निला सौंस व श्री. विजय राय यांचे नगरसेवक पद रद्द करणेबाबत.

संदर्भ :- श्री. ब्रिजेश शर्मा यांची आपले सरकार पोर्टलवरील टोकन क्र. Dist/MNTH/ 2018/25529 date. 09/01/2018 अन्वये तक्रार. पान क्र. ३ व ७

१) श्री. ब्रिजेश शर्मा यांनी आपले सरकार पोर्टलवर संदर्भित तक्रारीद्वारे, मिरा भाईंदर महानगरपालिका नगरसेविका श्रीम. निला सौंस व नगरसेवक श्री. विजय राय यांनी सर्वे क्र. 397(जुना), 165 (नविन) मधील उद्याणासाठी आरक्षीत असलेल्या आरक्षण क्र. 261 वर अनधिकृतपणे वाचनालयाचे बांधकाम केल्याचे कळवून, त्यांचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार नगरसेवक पद रद्द करणेची मागणी केलेली आहे.

२) उक्त तक्रारीसोबत अर्जदारांनी पुरावा म्हणुन 1) आरक्षण क्र. 261 दर्शविणाऱ्या डी.पी. प्लानची छायांकित प्रत व 2) बांधकामाचे फोटो जोडलेले आहेत. पान क्र. १० ते १३

३) वरील नमुद बांधकामाबाबत नगररचना विभाग तसेच अतिक्रमण विभाग यांचेकडून वस्तुस्थितीदर्शक सविस्तर अहवाल मागविणे उचित होईल. तरी नगररचना विभाग तसेच अतिक्रमण विभाग यांचेकडून उक्त प्रकरणी सविस्तर अहवाल मागविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती आहे. अ

(सही) 24/1/18
लिपीक (कैलास म्हात्रे)

(सही)
प्र. नगरसचिव (वासुदेव शिरवळकर)

अ' प्रमाणे अहवाल मागविणेसाठी योग्य होईल
(सही) 24/1/18

मा. विधी अधिकारी (सई वडके)

(सही) 25/1
मा. उपायुक्त (मु.)(विजयकुमार म्हसाळ)

मान्य (सही) 29/1/18
मा. अतिरिक्त आयुक्त (माधव कुसेकर)

मा. आयुक्त (डॉ. नरेश गिते)

आ.क्र. 39
29/1/2018

9349
31/1/2018

टिप : कृपया टिपणी पान क्रमांक टाकावा, तसेच टिपणीच्या प्रत्येक परिच्छेदास अनुक्रमांक द्यावा. मार्जीन मध्ये पेन्सीलने संदर्भाचा पृष्ठ क्रमांक लिहावा. (आदेशानुसार)

ANNEXURE " B "
[ See rule 5 (1) ]

**First Appeal under section 19 (1) of the Right to Information Act, 2005**




To,
First Appellate Authority
Nagar Sachiv Department नगर सचिव विभाग
Mira Bhayandar Municipal Corporation,
Late Indira Gandhi Bhavan,
1st floor, Chhatrapati Shivaji Marg,
Bhayandar (w) - 401101

1. Full Name of the Applicant : Brijesh Sharma [RTI Activist & Member of AAP]
2. Address : Room No 403, Jupiter-A CHS LTd, Opp Deepak Hospital, Mira Bhayander Highway (East), Mumbai-401107. Mobile# 9322683456
3. Particulars of the Central/ State Public Information Officer
   (a) Name : PIO, Nagar Sachiv Department, Ward Office 04
   (b) Address : Mira Bhayandar Municipal Corporation, Bhayandar (w) - 401101
4. Date of submission of application for seeking information : 20-Jan-18
5. Date on which 30 days from submission of application are over : 19-Feb-18
6. **Reasons for appeal :--**
   a) The point wise information under RTI Act 7(9) required on 6 (a) to (b) not provided by the PIO **to make harassed to applicant purposefully**. Hence appeal filed.
   b) If really the info is not with him, then the PIO should have diverted my Application as per Sec. 6(3) to the concerned Dept.
7. **Prayer :--**
   a) **Pass order for recommendation of penalties to PIO of Rs 25000 & negative remarking in Annual Confidential Report.**
   b) Disciplinary action should be recommended to the State Chief Information Commissioner as per Circular No. Ra Ma Aa 2009 / 256 / Prs. Kra. 120 / 09 / 6 dated 29.5.2009. (Link: **Marathi GR. www.box.com/shared/bayvc186ih English Translation: www.box.net/shared/8jjz3hs7kp**) for denying info and for not implementing the RTI Act.)
   c) Kindly direct the PIO to provide the information immediately and free of charge.
   d) Inform the concerned PIO that the appellant will move a Second Appeal before the SIC under Section 19(3) and will demand imposition of Penalty under Section 20 of the RTI Act, at the rate of Rs. 250.00 for every day of delay (subject to a maximum of Rs. 25,000.00) from the date the information till the date the information is actually given to me.
   e) In-accordance with the letter & spirit of the provision of section 19 (5) of the RTI Act, 2005 during the course of the first appeal proceedings kindly put the responsibility on the PIO to prove that the denial of a request was justified.
8. Last date for filing the appeal : 21-March-18
9. Particulars of Information
   (a) Nature and subject matter of the information required : Please refer the copy of the RTI Application that have been attached along with this appeal letter.

**Enclosed :--** Copy of my RTI Application and PIO Reply Attached.

**FAA Please make a Note :--**

a. Kindly provide the information point-wise and in English language as far as possible as required under Section 6 (1), 4 (3) and 7 (9) of the RTI Act, 2005.
b. If any information is denied then please quote the exemption clause of Section 8 (1) and a brief reason as to how it applies. This is a requirement of the RTI Act, as per Section 7 (8) (i) read along with Section 19 (5).
c. As per Sec 7(6) of the RTI Act, the PIO should now provide me the information "free of charge" since the provision of information has been delayed beyond the mandated 30 days as provided in Sec 7(1) of the RTI Act.

Date : 17/03/2018
Place : Mira Bhayander

[Brijesh Sharma]

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/अपिल/ ०७ /२०१७-१८

दिनांक :- ९६/४ /२०१८

प्रति,
श्री. ब्रिजेश शर्मा,
रुम नं. 403, ज्युपीटर-ए को.ऑ.हौ.सो.,
दिपक हॉस्पीटल मागे, मिरा भाईंदर हायवे (पूर्व)

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
महानगरपालिका नगरसेविका श्रीम. निला सोंस व नगरसेवक श्री. विजय राय यांचे नगरसेवकपद रद्द करणेबाबत आपण दि. 09/01/2018 रोजी आपले सरकार पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रारीसंबंधी माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 17/03/2018 रोजीचा अपिलीय अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्राच्या अनुषंगाने आपण दि. 20/01/2018 रोजी माहिती अधिकार नियमाअंतर्गत दाखल केलेल्या अर्जावर संदर्भित प्रथम अपील दाखल केलेले आहे.

आपण दाखल केलेल्या अपिलीय अर्जावर दि. 20/04/2018 रोजी सकाळी 11.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, नगरसचिव दालन येथे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. तरी सदर सुनावणीच्या वेळी आपण उपस्थित रहावे.

(वासुदेव शिरवळकर)
अपिलीय अधिकारी तथा
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
मिरा भाईंदर महानगरपालिका

करून
12-4-18

\\Virendra\D\01 Nagar Sachiv\Mahiti Adhikar\2014-15\Apil\2017\Apil Letter - Brijesh Sharma.docx

To,

First Appellate Authority,

Nagar Sachiv,

Mira Bhayandar Municipal Corporation,

Late Indira Gandhi Bhavan,

Chhatrapati Shivaji Marg,

Bhayandar West - 401101

**Subject :-- Authorizing Mr. Ram Gopal Verma ji to attend FAA meeting**

Dear Sir,

I am Brijesh Sharma, hereby authorize **Mr. Ram Gopal Verma ji** to attend on behalf of me on my all first appeal meeting on RTI letters today on dated 20-04-2018 @11am, because I am unable to attend personally due to conflict in my business schedule.

Place : Mira Bhayander

Date : 20/04/2018

[Brijesh Sharma]

[RTI Activists & Member of

AAM AADAMI PARTY]

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगरसचिव कार्यालय

दि. २०/०४/२०१८

श्री. ब्रिजेश शर्मा यांनी दि. २०/०१/२०१८ रोजी दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जामध्ये नमुद महापालिका सन्मा. सदस्य श्री. विजय राय व श्रीम. निला सोंस यांचेसंबंधीत दाखल तक्रारीबाबत मुद्देनिहाय माहिती प्राप्त न झाल्याचे नमुद करुन दि. १७/०३/२०१८ रोजी अपिलीय अर्ज दाखल केलेला आहे. या अपिलीय अर्जावर दि. २०/०४/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, नगरसचिव दालन येथे सुनावणी आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सुनावणीस खालील अर्जदार / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| १ | श्री./श्रीम. वासुदेव शिरवळकर अपिलिय अधिकारि | [signature] |
| २ | श्री./श्रीम. कैलास म्हात्रे जन माहिति अधिकारि | [signature] २०/४/१८ |
| ३ | श्री./श्रीम. ब्रजेश शर्मा S/O. राम गोपाल वर्मा | [signature] 20/4/2018 |
| ४ | श्री./श्रीम. ---------------------------------------- | |

०/६

# मिरा भाईदर महानगरपालिका

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.).

जा.क्र.मा.अधि./अपिल/०१/२०१८
प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव
मिरा भाईदर महानगरपालिका.
दि. २०/०४/२०१८

**प्रथम अपिलिय अधिकारी तथा नगरसचिव मिरा भाईदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१)अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील**

श्री. ब्रिजेश शर्मा ...... अपिलार्थी
रुम नं. ४०३, ज्युपीटर ए को.ऑ.हौ.सो.
दिपक हॉस्पीटल समोर,
मिरा भाईंदर हायवे (पूर्व)
मुंबई ४०११०७

विरूध्द

जनमाहिती अधिकारी ...... प्रतिवादी
नगरसचिव विभाग
मिरा भाईदर महानगरपालिका

:- विवेचन :-

अपिलार्थी श्री. ब्रिजेश शर्मा रा. रुम नं. ४०३, ज्युपीटर ए को.ऑ.हौ.सो. दिपक हॉस्पीटल समोर, मिरा भाईंदर हायवे (पूर्व) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जन माहिती अधिकारी, यांचेकडे दि. २०/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल :-**

महानगरपालिका नगरसेविका श्रीम. निला सोंस व नगरसेवक श्री. विजय राय यांचे नगरसेवक पद रद्द करणेबाबत दि. ०९/०१/२०१८ रोजी आपले सरकार पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रारीसंबंधी माहिती मिळणेबाबत.

**अपिल दाखल करण्याचे कारणे :-**

मागितलेली माहिती अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेल्या नमुन्यामध्ये न दिलेबाबत अपीलार्थी यांनी दि. १७/०३/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले आहे.

**सुनावणीचा तपशिल :-**

अपिलार्थी श्री. ब्रिजेश शर्मा यांचे प्राप्त अपिल अर्जावर दि. २०/०४/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी आयोजित केली असता, सदर सुनावणीस अपिलकर्ता श्री. ब्रिजेश शर्मा स्वतः हजर न राहता त्यांनी लेखी पत्राद्वारे प्राधिकृत केलेले प्रतिनीधी श्री. रामगोपाल वर्मा हजर होते.



इंद्रावती शर्मा
23-4-2018
5.30

**<u>अपिलकर्ता यांचे प्रतिनीधी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-</u>** मला माझे लेखी म्हणणे मांडायचे आहे. तरी मला अर्जावर म्हणणे मांडायची संधी द्यावी. तसेच आम्ही दिलेल्या फॉर्मेट मध्ये माहिती पाहिजे. कोणत्या तारखेला सबमीट झाले, त्यावर कोणती कार्यवाही झाली. जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरामध्ये कार्यवाही काय केली हे नमुद नाही.

**<u>अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-</u>** आपणांस आपले लेखी म्हणणे मांडायचे असल्यास कृपया आपण लेखी द्यावे. आपण दिलेल्या अपिल अर्जावर लिहीता येणार नाही. तरी कृपया आपण स्वतंत्र पानावर किंवा आपणांस प्राधिकृत केलेल्या पत्रावर आपले लेखी म्हणणे द्यावे.

**<u>जनमाहिती अधिकारी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-</u>** अर्जदार यांनी अर्जात नमुद केले आहे की, त्यांनी दि. ०९/०१/२०१८ रोजी आपले सरकार पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही झाली. सदर माहिती अर्जदार यांनी तयार केलेल्या फॉर्मेट मध्ये मागणी केली आहे. त्या अनुषंगाने आपणांस आपल्या अर्जात नमुद फॉर्मेट मध्ये माहिती न देता आपणांस अपेक्षीत तीच माहिती सविस्तर लेखी दिलेली आहे की, आपल्या दि. ०९/०१/२०१८ रोजी आपले सरकार पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रार अर्जावर नगरसचिव विभागामार्फत सादर करण्यात आलेला अहवाल ज्या ज्या विभागात अग्रेषित करण्यात आला व अहवालावर कोण-कोणत्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी कोणत्या तारखेस झालेली आहे. याबाबतची माहिती लेखी स्वरुपात दिलेली आहे. तसेच नगरसचिव विभागामार्फत सादर करण्यात आलेला अहवाल व मुळनस्ती वर्ग नोंद रजिस्टरची छायांकित प्रत पुरावा म्हणुन दिलेली आहे.

**<u>अपिलकर्ता यांचे प्रतिनीधी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-</u>** सदर फॉर्मेट आम्ही बनविलेला नसुन माहिती अधिकार नियमातील कलम ७(९) नुसार फॉर्मेट मध्ये माहिती मागणी केली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आमच्या दि. ०९/०१/२०१८ रोजी आपले सरकार पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्यास उशिर केलेला असल्याने व जनमाहिती अधिकारी यांनी आम्हांस अपेक्षीत माहिती फॉर्मेट मध्ये न दिल्याने त्यांना रुपये २५ हजार इतका दंड आकारावा.

**<u>जनमाहिती अधिकारी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-</u>** अर्जदार यांनी दि. ०९/०१/२०१८ रोजी आपले सरकार पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करणेचा अधिकार जनमाहिती अधिकारी यांना नाही. माहिती अधिकार नियमाअंतर्गत जनमाहिती अधिकारी यांनी अभिलेखी उपलब्ध असलेली माहिती अर्जदारांस देणे अपेक्षीत आहे.

**<u>अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-</u>** जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारांस त्यांच्या तक्रार अर्जावर नगरसचिव विभागामार्फत सादर करण्यात आलेला अहवाल ज्या ज्या विभागात अग्रेषित करण्यात आला व अहवालावर कोण-कोणत्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी कोणत्या तारखेस झालेली आहे. याबाबतची माहिती लेखी स्वरुपात दिलेली आहे. अर्जदारांस अपेक्षीत माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली असल्याने, अपिलकर्ता यांनी मागणी केलेनुसार जनमाहिती अधिकारी यांना दंड आकारण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

## -: निर्णय :-

महानगरपालिका नगरसेविका श्रीम. निला सोंस व नगरसेवक श्री. विजय राय यांचे नगरसेवक पद रद्द करणेबाबत दि. ०९/०१/२०१८ रोजी आपले सरकार पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रार अर्जावर कोणती कार्यवाही केली याबाबत अर्जदारांनी दिलेल्या फॉर्मेटमध्ये जनमाहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याचे नमुद करुन श्री. ब्रिजेश शर्मा ह्यांनी प्रथम अपिल दाखल केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारांस त्यांच्या तक्रार अर्जावर नगरसचिव विभागामार्फत सादर केलेला अहवाल कोण-कोणत्या विभागास पाठविला व त्यावर स्वाक्षरी केलेल्या अधिकाऱ्यांची संपूर्ण सविस्तर माहिती दिनांकासह लेखी स्वरुपात दिलेली आहे. तसेच अहवाल व मुळनस्ती वर्ग नोंद रजिस्टरची छायांकित प्रत पुरावा म्हणुन दिलेली आहे.

माहिती अधिकार नियमातील कलम ७(९) नुसार माहिती ज्या स्वरुपात मागण्यात आली असेल त्याच स्वरुपात ती सर्वसाधारणपणे, पुरविण्यात येईल. कलम ७(९) मध्ये माहिती नमुन्यात द्यावी असा कुठेही उल्लेख नाही. अपिलार्थी यांनी नमुन्यात माहिती मागणी केलेली असल्याने कलम ७(९) लागु होत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारांस दिलेली माहिती त्यांना अपेक्षीत असलेली माहिती मुद्देनिहाय दिलेली आहे. तरी देखील जनमाहिती अधिकारी यांना शक्य असल्यास अर्जदारांनी दिलेल्या नमुन्यामध्ये सात दिवसांच्या आत श्री. ब्रिजेश शर्मा यांना माहिती पुरविण्यात यावी.

**(वासुदेव शिरवळकर)**
**अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

१) श्री. ब्रिजेश शर्मा
रुम नं. ४०३, ज्युपीटर ए को.ऑ.हौ.सो.
दिपक हॉस्पीटल समोर,
मिरा भाईंदर हायवे (पूर्व)
मुंबई ४०११०७

२) जनमाहिती अधिकारी तथा
उपसचिव, नगरसचिव विभाग
मिरा भाईदर महानगरपालिका

३) माहिती अधिकार अपील नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगरसचिव यांचे कार्यालय

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401101

## नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ अपिल 09 /2017-18 दि. 23 / 4 /2018.

प्रति,

श्री. ब्रिजेश शर्मा,

रुम नं. 403, ज्युपीटर-ए को.ऑ.हौ.सो.,

दिपक हॉस्पीटल मागे, मिरा भाईंदर हायवे (पूर्व)

**विषय :- महानगरपालिका नगरसेविका श्रीम. निला सोंस व नगरसेवक श्री. विजय राय यांचे नगरसेवकपद रद्द करणेबाबत दाखल केलेल्या तक्रारीसंबंधी माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :- 1) आपणांकडील दि. 20/01/2018 रोजीचा माहिती अधिकार नियमाअंतर्गत अर्ज.**

**2) या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./11/2018, दि. 29/01/2018.**

**3) आपणांकडील दि. 17/03/2018 रोजीचे प्रथम अपिल.**

**4) अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांचेकडील दि. 20/04/2018 रोजीचा आपल्या प्रथम अर्जावरील निर्णय.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांन्वये, संदर्भ 01 अन्वये आपण महानगरपालिका नगरसेविका श्रीम. निला सोंस व नगरसेवक श्री. विजय राय यांचे नगरसेवकपद रद्द करणेबाबत, दि. 09/01/2018 रोजी आपले सरकार पोर्टलवर आपण दाखल केलेल्या तक्रारीसंबंधी माहिती मिळणेबाबत माहिती नियमाअंतर्गत अर्ज दाखल केलेला आहे. त्या अनुषंगाने संदर्भ 02 अन्वये या कार्यालयाकडून आपणांस अपेक्षीत माहिती लेखी स्वरुपात देण्यात आलेली आहे.

आपणांस उपलब्ध् करुन दिलेली माहिती फॉर्मेटमध्ये नसल्याचे नमुद करुन आपण संदर्भ् 03 अन्वये प्रथम अपील दाखल केलेले आहे. उक्त अपिल अर्जावर दि. 20/04/2018 रोजी सकाळी 11.00 वाजता अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांनी सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणीवर अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांनी निर्णय पारित केलेला आहे की, जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारांस अपेक्षीत माहिती मुद्देनिहाय दिलेली आहे. तरी देखील जनमाहिती अधिकारी यांना शक्य असल्यास अर्जदारांनी दिलेल्या नमुन्यामध्ये सात दिवसांच्या आत अर्जदारांस अपेक्षीत माहिती पुरविण्यात यावी. अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांनी पारित केलेल्या निर्णयानुसार आपणांस पुढील नमुन्यात माहिती उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | करण्यात आलेली कारवाई | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | पुढील कारवाईसाठी अधिकाऱ्यांकडे पाठविला तो दिनांक |
|---|---|---|---|
| दि. 17/01/2018 (प्रभाग समिती कार्यालय क्र. 03 कडुन प्राप्त) | प्राप्त तक्रार अर्जात नमुद बांधकामाबाबत नगररचना विभाग तसेच अतिक्रमण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडून वस्तुस्थितीदर्शक सविस्तर अहवाल मागविणेस प्रस्ताव सादर | 1) श्री. वासुदेव शिरवळकर, मा. नगरसचिव | नगरसचिव विभाग - दि. 24/01/2018 |
| | | 2) श्रीम. सई वडके, मा. विधी अधिकारी | विधी विभाग - दि. 24/01/2018 |
| | | 3) श्री. विजयकुमार म्हसाळ, मा. उपायुक्त (मु.) | मा. उपायुक्त (मु.) - दि. 25/01/2018 |
| | | 4) श्री. माधव कुसेकर, मा. अतिरीक्त आयुक्त | मा. अतिरिक्त आयुक्त - दि. 29/01/2018 |
| | | 5) डॉ. नरेश गिते, मा. आयुक्त (तत्कालिन आयुक्त) | मा. आयुक्त - दि. 29/01/2018 |

23/04/18

इंद्रावतीशर्मा
23-4-2018
5.30

**(कैलास दामोदर म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

E:\\01 MD\01 NS\Mahiti Adhikar\2014-15\Letter – Brijesh Sharma